## प्रेसनोट

जळगांव
दि.२०.०१.२०२५

**बळीराम सोमा सोनवणे,वय ५६ वर्षे, व्यवसाय मुख्याध्यापक, जल्हा परिषद केंद्र शाळा, पिंपळकोठा बुद्रुक ता.एरंडोल जि. जळगांव यांनी १०००/—रुपये लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यान्वये कारवाई केले बाबत...**

---

यातील फिर्यादी हे जिल्हा परिषद केंद्र शाळा, पिंपळकोठा बुद्रुक,ता.एरंडोल,जि.जळगाव येथे शिक्षक पदावर व आलोसे हे मुख्याध्यापक पदावर कार्यरत आहेत. सदर शाळेची दि.१३.०१.२०२५ रोजी वार्षिक तपासणी झालेली आहे. असे असताना देखील आलोसे यांनी शाळेची वार्षिक तपासणी करणारे शिक्षण विस्तार अधिकारी जे.डी.पाटील साहेब यांच्या तर्फे शाळेच्या वार्षिक तपासणी अहवालात त्रुटी काढण्यात येउ नये या करिता त्यांना खुश करण्यासाठी त्यांचे नावे आलोसे यांनी फिर्यादीसह शाळेतील त्यांचे इतर ६ सहकारी शिक्षक यांचेकडे प्रत्येकी १ हजार रुपयाची मागणी केले बाबत दि.२०.०१.२०२५ रोजी फिर्यादी यांनी ला.प्र.वि.जळगाव घटकाचे सापळा पथकाकडे तक्रार लिहुन दिली होती.

सदर तक्रारीची दि.२०.०१.२०२५ रोजी पडताळणी केली असता वर नमुद आलोसे यांनी जिल्हा परिषद केंद्र शाळा, पिंपळकोठा बुद्रुक शाळेची वार्षिक तपासणी करणारे शिक्षण विस्तार अधिकारी जे.डी.पाटील साहेब यांना खुश करण्यासाठी त्यांचे करिता सदर शाळेतील फिर्यादी शिक्षक व त्यांचे सहकारी ६ शिक्षकांना प्रत्येकी १ हजार रुपये लाचेची मागणी केली. सदर लाचमागणी प्रमाणे त्यांनी शाळेतील इतर सहकारी ५ शिक्षकांकडुन पैसे गोळा करुन, जे.डी.पाटील साहेबांना वार्षिक तपासणीं करिता सर्वांचे वतीने पैसे दिल्याचे सांगुन, फिर्यादी कडुन आज दि.२०.०१.२०२५ रोजी १२.१५ वा.चे सुमारास जिल्हा परिषद केंद्र शाळा, पिंपळकोठा बुद्रुक शाळेतील मुख्याध्यापक कार्यालयात पंचासमक्ष १ हजार रूपये लाच रक्कम स्वत: स्विकारल्यानंतर त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे. त्यानंतर फिर्यादी यांनी आलोसे यांना साहेबांशी बोलुन घ्या असे सांगीतले. त्याप्रमाणे आलोसे यांनी जे.डी.पाटील साहेंबाना फोन करुन, फोनचा स्पिकर ऑन करुन इन्सपेक्शनचे कामाचे ते राहीलेल्या २ शिक्षकांचे २ हजार रुपये आले आहेत असे सांगीतले. तेव्हा त्यांनी मी आता बिझी आहे, नंतर फोन करतो असे सांगुन फोन कट केला. सदर वेळी जे.डी.पाटील साहेबांनी कसले २ हजार वगैरे असे म्हणुन कोणताही विरोध दर्शवला नाही म्हणुन त्यांचे विरुध्द एरंडोल पोलीस स्टेशन ०७/२०२५ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ अ प्रमाणे दि. २०.०१.२०२५ रोजी गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

सदरची कारवाई मा.श्रीमती शर्मिष्ठा घारगे—वालावलकर, पोलीस अधिक्षक, ला.प्र.वि. नाशिक परिक्षेत्र नाशिक व मा.श्री. माधव रेड्डी, अपर पोलीस अधिक्षक, ला.प्र.वि. नाशिक परिक्षेत्र नाशिक यांचे मार्गदर्शनाखाली करण्यात आली असुन पुढील तपास श्री.योगेश ठाकूर, पोलीस उप अधिक्षक, ला.प्र.वि.जळगांव हे करीत आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,जळगांव तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की,कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणीही शासकीय अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांचे वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील तर कृपया लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्रातील खालील नमुद कार्यालयाशी संपर्क साधुन निर्भिडपणे तक्रार नोंदवावी.

कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे कार्यप्रणाली वा तक्रारीबाबत माहीती पाहीजे असल्यास खालील नमुद दुरध्वनी क्रमांकावर सपंर्क साधावा महाराष्ट्रातील सर्व जनतेच्या दृष्टीने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार करण्यासाठी लॅन्डलाईन ते लॅन्डलाईन व मोबाईल ते लॅन्डलाईन अशी टोल फ्रि नंबर १०६४ ची सेवा सुरु करण्यात आली असुन सदर क्रमांकावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे कार्यप्रणाली संबंधी व करावयाच्या तक्रारी संबंधी नागरीकांनी संपर्क साधावा.

| अ.नं. | युनिटचे नाव | दुरध्वनी क्रमांक | टोल फ्रि नंबर |
|---|---|---|---|
| १ | नाशिक | ०२५३—२५७५६२८,२५७८२३० | १०६४ |
| २ | अहमदनगर | ०२४१—२४२३६७७ | १०६४ |
| ३ | जळगांव | ०२५७—२२३५४७७ | १०६४ |
| ४ | धुळे | ०२५६२—२३४०२० | १०६४ |
| ५ | नंदुरबार | ०२५६४—२३०००९ | १०६४ |

पोलीस उप अधिक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव

योगेश जी.ठाकूर
पोलीस उप अधिक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो,जळगांव